सं.फौ.ख.क्रं. ८४०/२०२२

सरकार –वि– विनोद शेगोकार

नि.क्र. १६

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – अंबादास हरी बाभुळकर

वय. ५७ वर्षे, व्यवसाय – मजुरी

राहणार– शेलोडी, ता. खामगाव, जिल्हा – बुलडाणा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती आर.बी.देवराज, सरकारी वकील.**

१. पोलीसांनी मला पोलीस स्टेशनमध्ये बोलविले होते. पोलीस स्टेशनमधून मी पोलीसांसोबत कोठेही गेलो नव्हतो. माझ्या समक्ष पोलीसांनी देशी दारुबाबत कोणतीही धाड टाकली नव्हती. माझ्या समक्ष काहीही जप्त केले नाही. पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला नव्हता. मी सही केली होती. आता मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र. १ म्हणुन सही आहे. त्यामधील मजकुर मला माहित नाही. त्याला सही पुरता **नि.क्र. १७** देण्यात येतो. पोलीसांनी माझे बयाण घेतले नव्हते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे, सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०१.०५.२०२१ रोजी पोलीसांनी मला भिमनगर, शेगाव येथे पंच म्हणून बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आरोपीच्या राहत्या घरात पोलीसांनी माझ्या समक्ष दारु बाबत धाड टाकली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष आरोपीच्या घरातून पोलीसांनी तीन प्लॅस्टीक पोतडीमध्ये असलेल्या ९० एम.एल. च्या टँगो पंच कंपनीच्या ७०० शिश्या असा एकूण १८,२३०/– रुपयांचा माल जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मुद्देमालामधून एक शिशी रासायनिक विश्लेशणासाठी वेगळी काढून ती शिशी माझ्या सहीने सिल करण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, तसा सविस्तर पंचनामा माझ्या समक्ष तयार केला व मी त्यावर वाचून समजून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखत असल्याने त्याला शिक्षेपासून वाचविण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**आरोपीचे विधीज्ञ श्री. अजय तायडे गैरहजर असल्याने तसेच आरोपीला साक्षीदाराला काहीही**

**<u>विचारायचे नसल्याचे सांगितल्याने साक्षीदाराचा उलटतपास नाही.</u>**

३. फेरतपास काही नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि. १७.०२.२०२५ | दि. १७.०२.२०२५ |